महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
मॉडेल कॉलनी , बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/शै.वि-४/२०२३/ 2005 दिनांक : 10 MAY 2024

**परिपत्रक-**

**प्रति,**
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व संस्था (पुणे विभाग, पुणे)

**विषय : MY Bharat Portal वर सर्व विद्यार्थ्यांची नोंदणी करणेसाठी विशेष मोहिम राबविणे बाबत.**

संदर्भ- उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय यांचे पत्र क्र. रासेयो-२०२३/प्र.क्र.२२६/रासेयो कक्ष दि.०८.०५.२०२४

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यात येते की, युवा कार्य व क्रिडा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी MY Bharat Portal वर, कार्यक्रम अधिकारी व रासेयो स्वंयसेवक व तसेच इतर सर्व विद्यार्थ्यांची नोंदणी करणेबाबत संदर्भिय पत्रातील संदर्भान्वये कळविण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत ३,५६,८०० स्वयंसेवकांची नोंद असून MY Bharat Portal वर फक्त १,१०,५८९ स्वयंसेवकांनीच नांव नोंदणी करण्यात आली आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून प्रमाण अत्यंत अल्प आहे. यास्तव या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक व इतर युवा तरूण जे १५ ते २९ या वयोगटात आहेत, अश्या विद्यार्थ्यांच्या नावांची नोंद MY Bharat Portal वर करणे तसेच रासेयो स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांनी नांव नोंदणी करणे सक्तीचे आहे. या कार्यक्रमाला गती देण्याकरिता आपल्या अधिपत्याखालील महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी यांच्या सहकार्याने तात्काळ विशेष मोहिम आयोजित करण्यात यावी. सदर विशेष मोहिमद्वारे आपल्या महाविद्यालयातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांच्या नावांची नोंद MY Bharat Portal वर करण्यात यावी. तसेच या विशेष मोहिम कार्यक्रमाच्या कार्यवाहीचा साप्ताहिक अहवाल दर शुक्रवारी सायंकाळी ०५.०० वा. पर्यंत क्षेत्रिय रासेयो संचालक, पुणे व या कार्यालयास कळविण्यात यावा.

सोबत- संदर्भिय पत्र

( डॉ. द. व्यं. जाधव )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- प्रोग्रामर, तं.वि.का. पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार इमारत, दालन क्र. ४१६,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई -४०० ०३२.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com
दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५

**तात्काळ**

क्रमांक: रासेयो-२०२३/प्र.क्र.२२६/रासेयो कक्ष
दिनांक: ०८ मे, २०२४

प्रति,

कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
रासेयो संलग्नित सर्व विद्यापीठे/संचालनालये

**विषय : MY Bharat Portal वर सर्व विद्यार्थ्यांची नोंदणी करणेसाठी विशेष मोहिम राबविणे बाबत.**

संदर्भ : 1.F.No.P.32-1/NSS/DTE/2023/2176-2228 Dt. 13/12/2023
2.F.No.१८/२२/NSS/RD Pune /२०२४-२५/२३२-२८९ Dt..०२ May, २०२४
3.क्र. रासेयो-२०२३/प्र.क्र.२२६/रासेयो, दि.०४/१२/२०२३ व १५/१२/२०२३
ची पत्रे कृपया पहावित.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने सर्व विद्यापीठे, +२ स्तर यांचे संचालक तथा कार्यक्रम समन्वयक यांना कळविण्यात येते की, युवा कार्य व क्रिडा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी MY Bharat Portal वर कार्यक्रम अधिकारी व रासेयो स्वंयसेवक व तसेच इतर सर्व विद्यार्थ्यांची नोंदणी करणेबाबत संदर्भाधिन पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय सेवा योजनेतंर्गत ३,५६,८०० स्वंयसेवकांची नोंद असून MY Bharat Portal वर फक्त १,५०,५८९ स्वंयसेवकांनीच नांव नोंदणी करण्यात आली आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून प्रमाण अत्यंत अल्प आहे. यास्तव सर्व कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांनी विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक व इतर युवा तरुण जे १५ ते २९ या वयोगटात आहेत, अश्या विद्यार्थ्यांच्या नांवांची नोंद MY Bharat Portal वर करणे तसेच रासेयो स्वंयसेवक व कार्यक्रम अधिकारी यांनी नांव नोंदणी करणे सक्तीचे आहे. या कार्यक्रमाला गती देण्याकरीता आपल्या अधिपत्याखालील महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी

यांच्या सहकार्याने तात्काळ विशेष मोहिम आयोजित करण्यात यावी. सदर विशेष मोहिमव्दारे आपल्या विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांच्या नावांची नोंद MY Bharat Portal वर करण्याबाबत कार्यक्रम अधिकारी यांना आपल्या स्तरावरुन तात्काळ सूचना निर्गमित करण्यात याव्यात. याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा साप्ताहिक अहवाल दर शुक्रवारी सायंकाळी ०५.०० वा. पर्यत क्षेत्रिय रासेयो संचालक, पुणे व या कार्यालयास कळविण्यात यावा.

(डॉ. निलेश मो. पाठक)
राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना,महाराष्ट्र शासन